# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/08/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई
## वाहनासह एकुण २,५८,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत येणाऱ्या ०५ कि.मी. अंतरावर मौजा दहेगाव येथे दिनांक १८/०८/२०२३ चे १९.१० वा. ते १९.५० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, मौजा दहेगाव येथे ट्रॅक्टरच्या साहाय्याने अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीस स्टेशन खापरखेडा नागपूर ग्रामीण येथील स्टाफने घटनास्थळी जावुन वाहन थांबवुन चेक केले असता **आरोपी नामे— संदिप रामराव पांडे, वय ३६ वर्ष, रा. दहेगाव रंगारी सावनेर** हा त्याचे ट्रॅक्टर क्र. एम एच ४० ए १००७ नी त्या मागील डाला क्र. एम एच ३१/ झेड १६८८ नी अवैध्यरीत्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक करतांना मिळून आल्याने आरोपीच्या ताब्यातून लाल रंगाचा महेंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४०/ए— १००७, किंमती अंदाजे १,५०,०००/—रु, तसेच ट्रॅक्टरच्या मागील लाल रंगाचा डाला क्र. एम एच ३१ झेड १६८८, किंमती १,००,०००/—रुपये मध्ये अंदाजे १ ब्रास रेती किंमती ४,०००/—रुपये असा एकूण २,५८,०००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोलीस हवालदार शैलेश यादव पोस्टे खापरखेडा यांचे रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक मुकेश वाघाडे पोस्टे खापरखेडा मो. नं. ८३२९८८६१२० हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील हल्दीराम कंपनी, गुमथळा येथे दिनांक १४/०७/२०२३ चे ००.०१ वा. ते दिनांक १२/०८/२०२३ चे ०३.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— राजेश सुरेशचंद्र व्यास, वय ५० वर्ष, रा. शंकर नगर नागपुर हे हल्दीराम कंपनी येथे रॉ मटेरीयल इंचार्ज म्हणुन मागील ७ वर्षा पासुन काम करीत आहे. दिनांक १६/०८/२०२३ रोजी कॅबीनमध्ये बसले असता फॅक्टरीचे मॅनेजर नामे— रवि मानकर यांनी फिर्यादीला त्यांच्या कॅबिनमध्ये बोलवले व तुमच्या स्टोंर डिपार्टमेंट मधुन १ टन माल मुंग दाल ५० किलो ची बोरी चोरी झाली आहे. आरोपि नामे— १) गिरीश बळीराम मस्के, रा. गोंदिया, २) आशिष राजेंद्र चापले, रा. गोंदिया ३) मच्छिंद्र उर्फ मनिष रूशि ठाकरे, रा. गोंदिया यांनी मिळुन दिनांक १२/०८/२०२३ ला मुंगाच्या दाळीच्या बोरी चोरून गाडी मध्ये लोड करून घेउन गेले. त्याच्या नंतर फिर्यादी व सीक्युरीटी हल्दीरामच्या मदतिने कंपनिमध्ये लागले असलेले सीसीटीव्ही फुटेजचे आधारावर व गोडावुन हेल्पर मध्ये काम करणारा शुभम तिवारी यांना विचारपुस केली असता तेव्हा माहीती झाले की वरील आरोपी यांनी ५० किलोच्या एकुण १०८ बोरी किंमती अंदाजे ५५००/— रू प्रमाणे ५,९४,०००/— रूपयाचा मुद्देमाल गाडी क्र. एम. एच.— ३१/सी.क्यु— ४९१२ मध्ये लोड करून चोरून कंपनीच्या बाहेर घेऊन गेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. चौधरी मो. नं. ७०३८८२२२०५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर